# 'इम्युनिटी बूस्टर'चे विद्यापीठात वाटप

**सकाळ वृत्तसेवा**

आर. के. नगर, ता. ३० : सिद्धगिरी मठाच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठ सेवक संघातर्फे रोगप्रतिकार शक्तीवर्धक द्रावण (इम्युनिटी बूस्टर) चे वाटप अध्यक्ष बाबा सावंत यांच्या हस्ते झाले. आठवडाभर वाटप होणार असून, त्याचा लाभ विद्यापीठातील घटकांनी घ्यावा, असे आवाहन सावंत यांनी केले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सेवक संघाने अत्यावश्यक सेवेसाठी विद्यापीठात व जिल्हा प्रशासनात कामास येणाऱ्या सेवकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी डॉ. अप्पासाहेब पवार चौक व विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर फ्लेक्स बोर्ड लावले. मेमध्ये कर्मचाऱ्यांची प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी अर्सेनिक अल्बम औषधांचे मोफत वाटप डॉ. हिंमतसिंह शिंदे, डॉ. रूपाली शिंदे यांच्या सहकार्याने केले. रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी सेवक संघाने निर्णय घेतल्यावर सिद्धिगिरी मठाने मदतीसाठी पुढाकार घेतला. इम्युनिटी बूस्टर उपलब्ध करून दिले.



संक्षिप्त

# विद्यापीठ 'आयएसओ' मानांकन ऑनलाईन ऑडिटची प्रक्रिया पूर्ण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे 'आयएसओ' मानांकन ऑनलाईन ऑडिटची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. संबंधित कंपनीकडून पुढील वर्षासाठीचे मानांकन प्रमाणपत्र लवकरच दिले जाणार आहे. विद्यापीठास गतवर्षी 'टीयूडी - सूड' कंपनीकडून आयएसओ -९००१-२०१५ मानांकन मिळाले. त्या अनुषंगाने दुसऱ्या वर्षासाठी तीन सदस्यीय पथक आणि विद्यापीठातील अंतर्गत मूल्यमापन अधिकारी यांच्यामार्फत दोन दिवस ऑनलाईन ऑडिट करण्यात आले. ऑडिटची प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे, असे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले.

# पदवी परीक्षांसाठी वस्तुनिष्ठ प्रश्नांचा पर्याय?

## ऑनलाईन-ऑफलाईन दोन्ही पर्याय; कुलगुरूंच्या अहवालातील महत्त्वाची सूचना

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील विद्यापीठांच्या पदवीच्या अंतिम वर्षाची परीक्षा वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या आधारे घ्यावी तसेच विद्यार्थ्यांना ऑनलाईन तसेच ऑफलाईन असे दोन्ही पर्याय देण्याबाबतची महत्त्वाची सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने नेमलेल्या समितीने केल्याचे सूत्रांकडून समजते. त्याचबरोबर ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेणे शक्य नसल्याने 'यूसीजी'कडे मुदतवाढ द्यावी, अशी विनंती केल्याचीही खात्रीलायक माहिती मिळाली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी दिलेल्या निर्देशानंतर उच्च व तंत्रशिक्षण विभागाने परीक्षा नेमक्या कशा घ्यायच्या, याबाबत निर्णय घेण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली सहाजणांची समिती नेमली होती. या समितीची बैठक रविवारी सकाळी ११ वाजता पार पडली. या बैठकीत झालेल्या चर्चेनंतर विद्यापीठस्तरावर परीक्षांचे नियोजन करण्यात येईल, असे ठरले. राज्यातील कोरोना आणि त्याचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन सर्वच विद्यापीठांनी ऑफलाईन परीक्षा घेणे कठीण असल्याचे मत या अहवालात नोंदविण्यात आले आहे. तर दुसरीकडे मुंबई आणि पुणे या दोन विद्यापीठ यांचा अपवाद वगळता राज्यातील इतर विद्यापीठांमध्ये ऑनलाईन परीक्षा घेणे शक्य नाही. त्यासाठीची यंत्रणा विद्यापीठांमध्ये उपलब्ध नाही. यामुळे ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही प्रकारच्या परीक्षा देण्याचा पर्याय देण्यात यावा, यावर कुलगुरूंचे एकमत झाल्याचे समजते. हे नियोजन सोपे व्हावे व परीक्षा केंद्रांवर गर्दी होऊ नये, यासाठी वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या आधारे परीक्षा घेण्यात यावी, अशी सूचनाही समितीने केल्याचे सूत्रांकडून समजते. याचबरोबर परीक्षांचे नियोजन करण्यासाठी कशाप्रकारे काम करावे तसेच त्यासाठी लागणारा कालावधी लक्षात घेता ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा पूर्ण होणे शक्य नसल्याने आयोगाला पत्र लिहून मुदतवाढ मागावी, अशी सूचनाही समितीने केल्याचे समजते. सोमवारी यासंदर्भातील निर्णय जाहीर केला जाणार आहे.